**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सिनर्जी ग्रीन इंडस्ट्रीज लिमिटेड,(SGIL), प्लॉट क्रं.सी-१८, फाईव्हस्टार एम.आय.डी.सी., कागल, तालुका- कागल, जिल्हा – कोल्हापूर (४१६ २१६) महाराष्ट्र यांच्या सी.आय, एस.जी. स्टील कास्टींग – २८,८००.० टीपीए ते ६०,०००.० टीपीए पर्यंत प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

मेसर्स सिनर्जी ग्रीन इंडस्ट्रीज लिमिटेड,(SGIL), प्लॉट क्रं.सी-१८, फाईव्हस्टार एम.आय.डी.सी., कागल, तालुका- कागल, जिल्हा – कोल्हापूर (४१६ २१६), महाराष्ट्र यांच्या सी.आय, एस.जी. स्टील कास्टींग – २८,८००.० टीपीए ते ६०,०००.० टीपीए पर्यंत प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शनिवार, दिनांक, ०९ ऑक्टोबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शनिवार, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२१ रोजी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-८७ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०९३०-एफटीएस-००१२५ दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,कोल्हापूर
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

श्री प्रमोद माने, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. शंकरराव जाधव, अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री रविंद्र आंधळे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सदस्य, आयोजक यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली. आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक

असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री प्रमोद माने यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सिनर्जी ग्रीन इंडस्ट्रीज लिमिटेड,(SGIL), प्लॉट क्रं.सी-१८, फाईव्हस्टार एम.आय.डी.सी., कागल, तालुका- कागल, जिल्हा – कोल्हापूर (४१६ २१६), महाराष्ट्र यांचा सी.आय, एस.जी. स्टील कास्टींग – २८,८००.० टीपीए ते ६०,०००.० टीपीए पर्यंत प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ब ३ (ए) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील राज्य पर्यावरण तज्ज्ञ समितीस (SEAC-I) प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्यास अर्जास महाराष्ट्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक २६-११-२०२० रोजी प्रदान केली. आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र

पुढारी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत ०८-०९-२०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-कोल्हापूर, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय – कोल्हापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, कोल्हापूर, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४० ००१, उप विभागीय अधिकारी, इचलकरंजी विभाग, इचलकरंजी, जिल्हा-कोल्हापूर, तहसीलदार, तहसील कार्यालय-हातकणंगले/कागल/करवीर, जिल्हा – कोल्हापूर, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय- तळंदगे/पट्टणकोडोली/कसबा सांगाव/रुई/हलसवडे/सांगवडे, जिल्हा – कोल्हापूर, मुख्याधिकारी, हुपरी नगरपरिषद, हुपरी, जिल्हा-कोल्हापूर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ – कोल्हापूर, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण भांडवली गुंतवणूक रुपये ६३५.० लाख आहे. तर कारखान्यासाठी आवर्ती खर्च रुपये ७०.०० लाख एवढा प्रती वर्षी आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आलेः-

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**<u>खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-</u>**

**१) श्री तानाजी अनंतराव कोतारे, राहणार-तळंदगे, तालुका- हातकणंगले, जिल्हा-कोल्हापूरः-**

या प्रकल्पासून माझी शेतजमिन ही ८-१० कि.मी. अंतरावर आहे. प्रकल्पात जी चिमणी कार्यान्वित करण्यात आलेली आहे, त्यामुळे आमच्या शेतातील पीकांवर, माळरानावर राख/डस्ट पडते, त्यामुळे प्रदूषण वाढून रोगराई वाढू लागली आहे. त्याबाबत काय उपाययोजना करण्यात येणार आहेत?

डॉ. प्रशांत बन्ने, तांत्रिक सल्लागार यांनी सांगितले की आता कार्यरत प्रकल्पात ज्या स्टॅक/चिमण्या आहेत, त्यांना कॅसेट टाईप डस्ट कलेक्टर जोडण्यात आलेले आहेत. म.प्र.नि.मंडळाने धुळीचे उत्सर्जन १५०.० एमक्युब एवढे निर्देशित केलेल्या मानकांपेक्षा कमी प्रमाणात प्रकल्पातून धुळीचे उत्सर्जन उत्सर्जन होते. विस्तारिकरण प्रकल्पात आता तीन अतिरिक्त चिमण्या स्थापित करण्यात येणार असून त्यांनाही कॅसेट टाईप डस्ट कलेक्टर जोडण्यात येणार असून त्याची पूर्वपरवानगी म.प्र.नि.मंडळाकडून घेण्यात येणार आहे.

श्री कोतारे यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यक्षमतेने कार्यान्वित करण्यात येत नाही. आपली प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा फक्त कागदावरच आहे. या कागल फाईव्ह स्टार एमआयडीसीची कितीतरी डस्ट परिसरातील घरांवर, पिकांवर पडलेली असते. आपणास पाहयचे असेल तर आपण जनसुनावणीनंतर जाऊ शकतो. त्यावेळी प्रकल्प सल्लागार यांनी ह्या प्रश्नास फक्त आमचीच एकमेव कंपनी जबाबदार आहे असा मुद्दा होत नाही असे मत मांडले. यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प सल्लागार यांना सूचना केली की प्रकल्पात आपण जी सयंत्रणा कार्यान्वित करणार आहात, त्यामुळे धुळीचे उत्सर्जन होणार नाही, याबाबतच माहिती सांगण्यात यावी. त्याप्रमाणे आकस्मिक प्रसंग/अपघात झाल्यास आपली सयंत्रणा कोणती असेल याबाबत माहिती सांगण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की म.प्र.नि.मंडळाने निर्देशत केलेल्या मानकांपेक्षा धुळीचे उत्सर्जन हे कमी असणार आहे. त्याप्रमाणे जी स्टॅक/चिमणी असते, तिची उंचीबाबत निर्देशांचे पालन करावेच लागते. त्याचप्रमाणे कॅसेट टाईप डस्ट कलेक्टर कार्यान्वित केल्यानंतर ३०-४० मायक्रॉन एवढेच उत्सर्जन होते. त्यावेळी आयोजक यांनी मत मांडले की स्थानिक व्यक्तीनी साधा प्रश्न उपस्थित केलेले आहे की जर काही अपरिहार्य

कारणांमुळे प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा निष्क्रिय झाली आणि धुळीचे उत्सर्जन झाले, तर आपण काय करणार? प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांप्रमाणे प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. त्यावेळी आयोजक यांनी बैठकीत सांगितले की जर काही कारणांमुळे धुळीचे उत्सर्जन झाले तर प्रकल्प प्रवर्तकांना त्वरित उत्पादन प्रक्रिया बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी मत मांडले की जनसुनावणीचा अर्थ उपस्थितांनी बैठकीत विचारलेले सर्व प्रश्न व उत्तरे यांची नोंद घेणे. ते सर्व विषय इतिवृतांतासोबत शासनास सादर करणे. प्रकल्प प्रवर्तकांना तांत्रिकदृष्ट्या सर्व उपाययोजना करणे बंधनकारक आहे. परिसरातील सामान्य शेतक-यावर परिणाम होणार आहे, अशी जर त्याची भावना झाली, तर दरवेळी तो म.प्र.नि.मंडळाकडे जाऊ शकणार नाही. शेतातील काम सोडून दाद मागण्याची त्याच्यावर वेळ येऊ नये. यासाठी जी काही अत्याधुनिक सयंत्रणा असेल, ती कार्यान्वित करण्यात यावी आणि स्थानिकांबरोबर समन्वय साधाण्यात यावा.

प्रकल्पाचे पर्यावरण अधिकारी यांनी येथे स्पष्टीकरण दिले की जर एखादा आकस्मिक प्रसंग आल्यास, स्थानिकांना सूचना देण्यात येईल आणि प्रकल्पातील उत्पादन प्रक्रिया त्वरित बंद करण्यात येईल. आयोजक यांनी सांगितले संपूर्ण प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित झाल्याशिवाय प्रकल्प प्रवर्तकांना उत्पादन सुरु करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

## २) **श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, पर्यावरण परिरक्षणा संस्था, शिवाजीनगर, नालगोंडा जिल्हा, तेलंगण राज्यः-**

श्री सुनंदा रेड्डी यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे विस्तारीकरण हाती घेतल्याबद्दल अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की ते भारतातील पहिले पर्यावरणवादी आहेत की जे प्रकल्पास पाठिंबा देतात. भारतातील बरेच पर्यावरणवादी प्रकल्पांना विरोध करतात, मात्र मी प्रकल्पास पाठिंबा देतो. माझ्या मते बेकारी हे सर्वात जास्त सामाजिक प्रदूषण आहे. भारतात १८ ते ३५ वयोगटातील सुमारे ४० कोटी बेकार असताना त्यांना नोकरीची संधि मिळणे गरजेचे आहे. शासकीय नोक-या सर्वांनाच मिळत नाहित. केंद्र आणि राज्ये सरकारे फक्त ५६० लाख लोकांनाच नोक-या मिळतात. त्यामुळे इतर लोकांना खाजगी कंपन्यांमध्येच नोक-या मिळतात. यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री रेड्डी यांना सूचना केली की फक्त या प्रकल्पाविषयीस काही सूचना वा आक्षेप नोंदवावेत. त्यासअनुसरुन त्यांनी सांगितले की ते काही सूचना देऊ इच्छितात —

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरणाचे पाणी, जमिन, हवा यांचे योग्य प्रकारे सर्वेषण केले, त्याबद्दल त्यांनी पर्यावरण सल्लागार यांचे अभिनंदन केले. त्याचप्रमाणे प्रकल्पाच्या १० कि. मी. परिघातील माझी सूचना आहे की परिसरातील आरोग्य, पीकउत्पादन, भूजल व शैक्षणिक सर्वेषण करण्यात यावे, त्याचा डेटा गोळा करण्यात यावा. त्यांनी सांगितले की प्रकल्पात १० एकर जमिन आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी १० कि.मी. परिघातील भूगर्भातील पाण्याचे सर्वेषण करावे. पावसाचे पाणी वाचविण्यासाठी मोठी साठवण करण्याचे प्रयत्न करण्यात यावेत. पाणी हा मर्यादित स्त्रोत आहे. परिसरातील गावांमध्ये वृक्षारोपण करा. परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजूस हरित पट्टा, झाडे विकसित करण्यात यावीत. त्यामुळे धुळीच्या प्रदूषणापासून संरक्षण मिळेल. श्री रेड्डी यांनी सूचना केली की प्रकल्प परिसरातील गावांमध्ये हरित पट्टा विकसित करताना फळझाडे आणि औषधी वनस्पती अधिक प्रमाणात लावण्यात यावीत. स्थानिक युवक व युवतींना रोजगार मिळण्यासाठी

सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम हाती घेण्याची सूचना केली. त्यामुळे स्थानिकांना आपल्या प्रकल्पात किंवा इतर ठिकाणी रोजगाराची संधि मिळेल.

तसेच, श्री रेड्डी यांनी सूचना केली सीएसआर योजना राबविण्यासाठी समन्वय समितीची स्थापना करण्यात यावी त्यात कंपनीचे अधिकारी, प्रशासनातील अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा समावेश करण्यात यावा. त्यामुळे विश्वासाहर्ता वाढेल. त्यांनी सूचना केली की विशिष्ट कालावधीनंतर आरोग्य शिबिर आयोजित करण्यात यावे व श्री रेड्डी यांनी पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीस प्रकल्पास विना हरकत त्वरित मान्यता देण्याची सूचना महाराष्ट्र शासनास केली.

३) <u>श्री अजित गणपत शिरोळे, राहणार-तळंदगे,तालुका-हातकणंगले, जिल्हा-कोल्हापूर:-</u>

बैठकीत श्री कोतारे यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांना पाठिंबा देताना सांगितले स्थानिकांना होणा-या त्रासास सिनर्जी कंपनीबरोबरच इतर कंपन्या जबाबदार आहेत. त्यांनी सिनर्जी प्रकल्पाविषयी चांगल्या आणि इतर वाईट गोष्टीही सांगितल्या. चांगली गोष्ट म्हणजे प्रकल्पात किमान वेतनाप्रमाणे रोजगार देण्यात येतो. श्री शिरोळे य़ांना मागणी केली की तळंदगेतील अजून शिकलेली जी लोक आहेत, ती जर सक्षम असतील तर त्यांना प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी.

श्री शिरोळे यांना आक्षेप नोंदविला की प्रदूषणामुळे शेतीचे वार्षिक उत्पादन घटलेले आहे. शेती परवडत नाही. जर एमआयडीसीत काम मिळाले, तरच घरखर्च चालतो. ज्यांच्याकडे पशूधन आहे, त्यांनाही ते करणे परवडत नाही. त्यावेळी श्री शिरोळे यांना या प्रकल्पाविषयी आक्षेप नोंदविण्याची सूचना करण्यात आली.

त्यांनी आक्षेप नोंदविला की धूळ/डस्टमुळे जे प्रदूषण होते, त्यास ज़बाबदार असणा-या सर्व कंपन्यावर कारवाई करण्यात यावी, प्रदूषणामुळे

शेतीचे नुकसान झाले, ते कंपनीने द्यावे, अन्यथा आमच्या शेतजमिनी कंपनीने घेऊन स्थानिक शेतक-यांना दर महिन्याला काही रक्कम देण्यात यावी. स्थानिक शेतक-यांच्या विहिरींचे पाणी प्रदूषित झालेले आहे.

यावेळी प्रकल्प प्रवतर्कांच्या अधिका-यांनी माहिती दिली की विस्तारिकरण प्रकल्पात आजूबाजूच्या गावांतील लोकांनाच प्राधान्य देण्यात येणार आहे.

**४)श्री एच.मधुबाबू, सामाजीक पर्यावरण कार्यकर्ता, रुरल एनव्हायरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी, हैद्राबादः-**

श्री एच. मधुबाबू यांनी सांगितले की विस्तारिकरण प्रकल्पात फक्त स्थानिक लोकांनाच रोजगार देण्यात यावा. प्रदूषण नियंत्रणासाठी अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी. झाडे प्रदूषण प्रतिबंध करताता, म्हणून हरित पट्टा विकसित करण्यात यावा. सीएसआर आणि सीईआर निधी हा प्रकल्पबाधित परिसरातच खर्च करण्यात यावा. प्रकल्प विस्तारिकरणास पाठिंबा.

**५)श्री ए. सुदर्शन, पर्यावरण कार्यकर्ता, चेयुथा रुरल एण्ड एन्व्हॉरमेंट डेव्लपमेंट सोसायटी, वाडापट्टी, धर्मस्थला, नालगोंडा जिल्हा, तेलंगणा राज्यः-**

यांनी प्रकल्प विस्तारिकरणास पाठींबा देताना सांगितले की प्रकल्पात बालकामगारांना नोकरी देऊ नका. स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात यावी. सीएसआर निधी मूलभूत शिक्षणासाठी खर्च करण्यात यावा. कंपनीत सुरक्षा व्यवस्था योग्य प्रकारे ठेवण्यात यावी. मी कंपनी विस्तारिकरणास समर्थन देत आहे.

६) **<u>जयश्री संजय भोसले, सरपंच, तळंदगे ग्रामपंचायत, तालुका-हातकणंगले, जिल्हा-कोल्हापूरः-</u>**

गावातील शेती खूपच खराब झालेली आहे. १८ दिवसांनी एकदा आमच्या गावात पाणी येते. त्यासाठी पाण्याची सोय ही येथून होणे गरजेचे आहे. आता फक्त १२ तास पाणी येते. ते पूर्वीसारखे २४ तास उपलब्ध करण्यात यावे. त्याचप्रमाणे तळंदगे गावातील १२०० एकर जमिन एमआयडीसीला देण्यात आलेली आहे. तरी तळंदगे गावातील लोकांनाच प्रथम नोकरीत प्राधान्य देण्यात यावे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे विचार, सूचना वा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. त्यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीत दोन प्राथमिक मुद्दे उपस्थित झाले. स्थानिकांना रोजगार आणि बागयती शेतीवर प्रदूषणाचा होणारा परिणाम. त्यासाठी प्रकल्प प्रवतर्कांनी त्वरित उपाययोजना करावी. कंपनीच्या चांगल्या कामाबद्दलही स्थानिकांनी प्रशंसा केलेली आहे. रोजगार, देशाचे उत्पन्न् वाढण्यासाठी प्रकल्पांची गरज आहे. त्यांनी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात जनसुनावणीत चर्चा झाल्याबद्दल सर्व स्थानिकांचे अभिनंदन केले. अध्यक्षांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याच इतिवृतान्त समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त अंतिम पर्यावरणविषयक आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई येथे सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल. त्यांना जनसुनावणी बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

बैठकीत तसेच ई-मेल व्दारे ०७ निवेदन प्राप्त झाली असून पुढील कार्यवाहीसाठी सोंबत जोडली आहेत.

**(प्रमोद माने)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.न.मंडळ, कोल्हापूर

**(रविंद्र आंधळे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.न.मंडळ, कोल्हापूर

**(शंकरराव जाधव)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर,
जिल्हा-कोल्हापूर